# ओळख

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०२–०९–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

गेल्या काही वर्षात मानवाने सर्वच क्षेत्रात प्रचंड प्रगती साधली आहे. त्याची असंख्य उदाहरणं आपण सतत पाहतो. या प्रगतीमुळे ऐहिक आणि भौतिक पातळीवर अनेक सुखं मानवाच्या पुढे हात जोडून उभी राहिली. पण या सुखांमुळे माणूस खरोखरच सुखी झाला का? हा मूलभूत प्रश्न आता निर्माण झाला आहे. आणि त्याचं उत्तर नाईलाजाने ‘नाही’ असंच द्यावं लागेल. प्रत्येक व्यक्तीला सातत्याने अनेक समस्या, प्रश्न, आव्हानं भेडसावत असतात. या सर्व समस्यांना, प्रश्नांना, आव्हानांना तोंड देता देता प्रत्येक जण अगदी मेटाकुटीला येत असतो. त्यामुळे निर्माण होणाऱ्या अस्थैर्यात, बाँबस्फोट मालिकांसारख्या घटनांमुळे भरच पडत असते. परिणामी अनेक जण नैराश्याकडे झुकतात. अशा व्यक्ती ‘बुडत्याला काडीचा आधार’ या न्यायाने देवा–धर्माचा आधार घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात . नैराश्यामुळे, स्वत:वरचा विश्वास उडाल्यामुळे तरूण पिढी मठा–देवळांपुढे तासन्तास रांगांमध्ये उभी राहिलेली दिसते. स्वत:ला ‘निराधार’ समजणाऱ्या अशा व्यक्तींना ‘आधार’ द्यायला अनेक ‘समर्थ’ व्यक्ती आपल्या समाजात टपलेल्याच असतात. अशा ‘समर्थां’च्या आहारी गेलेल्या बहुतांश व्यक्ती एकतर अंधश्रद्धेकडे झुकतात किंवा त्यांचा देवा–धर्मावरचा विश्वासच उडतो.

हे असं होऊ नये, समाज अंधश्रध्देला बळी पडू नये, याची जाणीव आता मोठया प्रमाणावर समाजात निर्माण व्हायला लागली आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या दरम्यान असलेली अतिशय धूसर अशी सीमारेषा आता सुस्पष्ट होण्याची गरज निर्माण झाली आहे. शिवाय स्वत:कडे, कुटुंबाकडे, व्यवहाराकडे आणि समाजाकडे बघण्याची योग्य नजर विकसित होण्याची आता गरज आहे. आयुष्यात निर्माण होणाऱ्या मानसिक ताण–तणावांवर मात करण्यासाठी याचीच जरूरी आहे. आणि या सगळ्याबाबतीत योग्य मार्गदर्शन करण्याचं सामर्थ्य श्रीमद् नामचैतन्य भानुदास यांनी मांडलेल्या ‘अध्यात्म-विज्ञाना’त आहे. त्याचप्रमाणे आत्मिक आणि आध्यात्मिक मार्गावरची वाटचाल ‘अध्यात्म-विज्ञान’ सुकर करतं. त्या ‘अध्यात्म-विज्ञाना’ची ओळख आपण या सदरातून नियमितपणे करून घेणार आहोत .